# निवेदन

मी या निवेदनाद्वारे जाहीर करते की, **"गंगाधर पानतावणे यांच्या स्तंभलेखनाचा अभ्यास ('अर्थ आणि अन्वयार्थ' च्या अनुषंगाने)"** हा लघुप्रबंध संशोधन मार्गदर्शक **डॉ.शिवाजी विष्णू पाटील** (मराठी विभाग प्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वत: लिहिला असून सदर लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विषयातील एम. फिल. (मराठी) पदवीसाठी सादर केला आहे. हा लघुप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास पदवीसाठी किंवा अन्य पदविकेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

**अभ्यासक**

KumbharRR

**(कुंभार राणी रवींद्र)**

स्थळ - सातारा

दिनांक -२५ जानेवारी २०१०

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **कुंभार राणी रवींद्र** यांनी मराठी विषयावरील एम. फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे सादर करावयाचा **"गंगाधर पानतावणे यांच्या स्तंभलेखनाचा अभ्यास ('अर्थ आणि अन्वयार्थ' च्या अनुषंगाने)"** हा लघुप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. कुंभार राणी रवींद्र हीने लिहिलेला लघुप्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारित आहे. हा लघुप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास पदवीसाठी किंवा अन्य पदविकेसाठी सादर करण्यात आलेला नाही.

सदर लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

**मार्गदर्शक**

**(डॉ. शिवाजी विष्णू पाटील)**
**प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग**
**छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा**

स्थळ - सातारा
दिनांक - २५ जानेवारी २०१०

# CERTIFICATE

This is to certify that **Kum. Kumbhar Rani Ravindra** of this coollege, was regular student of **M. Phil. (Marathi)** during the academic year **2007-08** to **2008-** 09 to the best of my knowlwdege she bears a good moral character.

**Principal**
**Chh. Shivaji College,**
**SATARA**

Place : Satara

Date : 25/01/ 2010

# मनोगत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत एम. फिल. (मराठी) पदवीसाठी लघुप्रबंधाच्या स्वरूपात मांडण्यासाठी ''गंगाधर पानतावणे यांच्या स्तंभलेखनाचा अभ्यास ('अर्थ आणि अन्वयार्थ' च्या अनुषंगाने)'' हा विषय निवडला आहे. दैनिक वृत्तपत्रातून येणारे स्तंभलेखन आणि विविध विषयावरील लेख हे वाचण्याच्या आवडीमुळे आणि मार्गदर्शकांनी अभ्यासासाठी 'स्तंभलेखन' या नवीन विषयातील वेगळी दिशा. 'स्तंभलेखन' या वाङ्मय प्रकाराविषयी उत्सुकता. वृत्तपत्रातील एक नवीन विषय घेऊन अभ्यास करण्याची उत्सुकता आणि आव्हान मी स्वीकारले. या विषयावर पूर्वी अभ्यास न झाल्यामुळे त्यावर सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न केवळ माझे मार्गदर्शन, माझे गुरूवर्य डॉ. शिवाजी विष्णू पाटील यांच्यामुळेच. त्यांनी दाखवलेली दिशा, संशोधनासाठी त्यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन आणि वेळोवेळी समजून घेतल्यामुळेच आज हा अभ्यास पुर्णत्वाकडे जात आहे. याचा मला खूप आनंद होत आहे.

यासाठी माझे मार्गदर्शक व गुरूवर्य डॉ. शिवाजी विष्णू पाटील यांची मी आयुष्यभर ऋणी राहीन. तसेच छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य, छत्रपती शिवाजी कॉलेजमधील ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सर्व कर्मचारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, नगरवाचनालय, सातारा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक या व अशा अनेक ठिकाणाहून मला वेळोवेळी ग्रंथसंपदा व सहकार्य मिळाले.

ज्यांनी मला घडवले, ज्यांनी माझ्यावर सुसंस्कार केले, ज्यांनी माझ्या विचारांना नेहमीच योग्य दिशा दिली असे माझ्या प्रेरणास्थानी असलेले माझे वडील श्री. रवींद्र कुंभार, आई सौ. ताई कुंभार, माझे सासरे यशवंत कुंभार, सासूबाई सौ. पारूबाई कुंभार तसेच मला सतत प्रेरणा देणारे आणि वेळोवेळी मदत व पाठिंबा देणारे माझे पती प्रा.अजित यशवंत कुंभार, माझे मोठे दीर अशोक कुंभार, सौ. रेखा कुंभार, माझा भाऊ वहिनी श्री. श्रीकुमार कुंभार, सौ. रोहीणी कुंभार, बहीण सौ. शुभांगी केंजळकर, संदिप केंजळकर तसेच माझे सर्व कुटुंबीय (मांगरूळ) आणि माझी मुलगी पूजा या सर्वांच्या सहकार्यामुळे यांच्या आशीर्वादामुळे या सर्वांच्या प्रेरणेमुळे मी आज या ठिकाणी उभी आहे. यांचे ऋण मी आयुष्यभर विसरणार नाही.

त्याचप्रमाणे शुभांगी माने, नाथाजी गायकवाड, नंदकुमार शेडगे, प्रशांत शेडगे, रोहित कुंभार, शुभांगी कुंभार आणि मराठी विभागातील सर्व गुरूवर्य आणि एम. फिल.चे सर्व सहकारी यांचे विशेष आभार आणि एल. बी. एस.कॉलेजमधील प्रा. महेश गायकवाड यांचे सहकार्य कधीही विसरू शकणार नाही.

सदर प्रबंधाची आकर्षक बांधणी व कॉम्प्युटर टायपिंग करून देणारे मे. रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग, साताराचे श्री. ढवळे आणि त्यांचे सहकारी यांची मी मन:पूर्वक आभारी आहे.

हा अभ्यास करत असताना साह्यभूत झालेले माझे सर्व गुरूवर्य, अनेक व्यक्ती, ग्रंथालये, मित्रमैत्रिणी, नातेवाईक या सर्वांचेच शतशः आभार.

**(कुंभार राणी रवींद्र)**

# भूमिका

दीडशे वर्षाची परंपरा लाभलेल्या 'स्तंभलेखन'हा प्रकार वृत्तपत्रातील महत्त्वाचा घटक बनला आहे. दैनंदिन वृत्तपत्रातून तसेच रविवारच्या पुरवण्यातून अशा स्तंभलेखनाची संख्या वाढत आहे. स्तंभलेखनातून वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण असे लेखन होत आहे. यामुळे वाचकांची ललित व वैचारिक अशा दोन्ही प्रकारच्या वाचनाची गरज स्तंभलेखनामुळे पूर्ण होते. या स्तंभलेखनामध्ये आत्मचरित्रपर, चिंतनपर, विनोदी, सामाजिक, राजकीय, वाङ्मयीन, भाषासंस्कृती विषयक अशा विविध स्वरूपाचे स्तंभलेखन प्रसिद्ध होत आहे. वाचकांना 'वाचते' ठेवण्याची महत्त्वाची कामगिरी स्तंभलेखनाने पार पाडली आहे. काही वेळा वाचक वाचनाचा कंटाळा करतात पण वृत्तपत्रे, नियतकालिके चाळताना किंवा वृत्तपत्र चाळून झाल्यानंतर आपल्या आपल्या आवडत्या लेखाचे वाचन करायला तो कंटाळत नाही. वाचकांना 'वाचते' ठेवणाऱ्या या स्तंभलेखांचा विवेचक अभ्यास या लघुप्रबंधिकेमध्ये करण्यात आला आहे.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या एम. फिल. अभ्यासक्रमाच्या लघुप्रबंधिकेसाठी विषय निवडण्याच्या संदर्भात मार्गदर्शक छ. शिवाजी महाविद्यालय, सातारचे मराठी विभाग प्रमुख डॉ.शिवाजी विष्णू पाटील यांच्याशी चर्चा करताना गंगाधर पानतावणे यांच्या स्तंभलेखनावरील 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथाचा अभ्यास करण्याचे ठरले.

'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथाचा विवेचक अभ्यास करून स्तंभलेखनाचे स्वरूप समजावून घेण्यासाठी प्रस्तुत प्रबंधिकेचे पाच प्रकरणात विभागणी करण्यात आली. पहिल्या प्रकरणात स्तंभलेखनाची प्रेरणा, स्वरूप व व्याप्ती यांचा अभ्यास करताना स्तंभलेखनाचा इतिहास, मराठीतील स्तंभलेखन, स्तंभलेखनाचे स्वरूप आणि व्याप्ती यांचा विचार केला आहे. दुसऱ्या प्रकरणात अभ्यासासाठी निवडलेल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' पुस्तकाचे लेखक गंगाधर पानतावणे यांची व्यक्तिमत्त्व व स्तंभलेखनाचा मागोवा घेतला आहे. प्रकरण तीनमध्ये 'अर्थ आणि अन्वयार्थ ग्रंथाचा स्तंभलेखनाच्या दृष्टीने विचार' या प्रकरणामध्ये स्तंभलेखनाच्या दृष्टीने विविध वैशिष्ट्ये व त्यातील आशयसूत्रे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. प्रकरण चारमध्ये 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाचा सामाजिक व वाङ्मयीन दृष्ट्या विचार व त्यातील भाषाशैली यांचा शोध घेतला आहे. प्रत्येक प्रकरणाचा

अभ्यास करताना विवेचन करून हाती आलेले निष्कर्ष प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी मांडण्यात आलेले आहेत. या सर्व निष्कर्षांचा एकत्रित विचार व विश्लेषण करून सर्व अभ्यासाचा परिपाक म्हणून हाती आलेल्या निष्कर्षांची मांडणी उपसंहार या पाचव्या प्रकरणात केली आहे. गंगाधर पानतावणे यांची ग्रंथसंपदा, त्यांना मिळालेली राष्ट्रीय. आंतरराष्ट्रीय पारितोषिके, व्याख्याने यांचे विविध विषय परिशिष्टामध्ये मांडलेले आहेत.

या लघुप्रबंधिकेमध्ये प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी निवडलेल्या ग्रंथाचे संदर्भ दिले आहेत. 'स्तंभलेखन' या वृत्तपत्रीय लेखनामध्ये दिसणारे वाङ्मयीन गुण आणि त्याच स्तंभलेखनाचे ग्रंथरूप निर्माण झाल्यानंतर त्याला प्राप्त होणारे वाङ्मयीन 'अक्षर' रूप शोधण्याचा प्रयत्न या प्रबंधिकेत करण्यात आला आहे.

-----x-----

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | स्तंभलेखन : प्रेरणा, स्वरूप व व्याप्ती. | १ - ४३ |
| २. | गंगाधर पानतावणे यांचे वाङ्‌मयीन व्यक्तित्व व स्तंभलेखन. | ४५ - ८५ |
| ३. | 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाचा स्तंभलेखनाच्या दृष्टीने विचार. | ८७ - १२६ |
| ४. | 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाचा सामाजिक व वाङ्‌मयीनदृष्ट्या विचार. | १२७ - १७१ |
| ५. | उपसंहार. | १७३ - १७६ |
| | संदर्भ ग्रंथसूची | १७७ - १८१ |
| | परिशिष्ट | १८३ - १८९ |